सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
बुधवार, दि. १३ डिसेंबर २०१७

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव



# बॅडमिंटन स्पर्धेत डी. पी. भोसले कॉलेजचा डंका

**कोरेगाव, १२ डिसेंबर**

आष्टा येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत बॅडमिंटन स्पर्धेत डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या खेळाडूंनी यश संपादन केले आहे. दि. ७ व ८ डिसेंबर रोजी अण्णासाहेब डांगे कॉलेज आष्टा येथे ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

अतिशय उत्साहात झालेल्या या स्पर्धेत विविध महाविद्यालयांना मागे टाकत डी. पी. भोसले कॉलेजचा बॅडमिंडन संघ या इंटरझोनल स्पर्धेत उपविजेता ठरला आहे. या संघामध्ये गणेश संकपाळ, अथर्व चव्हाण, सौरव चव्हाण, सोहेल सलाती, सनी यादव, शशिकांत माने, अजय साठे हे खेळाडू होते. पहिल्यांदाच महाविद्यालयाने इंटरझोनल बॅडमिंटन स्पर्धेत असे यश मिळविले आहे. त्यामुळे सर्व स्तरातून खेळाडूंचे अभिनंदन होत आहे. या खेळाडूंना प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत तसेच फिजिकल डायरेक्टर बी. डी. भोसले यांनी मार्गदर्शन केले. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचिव डॉ. बी. के कराळे यांनी खेळाडूंचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तभा प्रतिनिधी